# संगीत मानापमान
# व
# कीचकवध

**श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर**

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**संगीत मानापमान : श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर**

© सुरक्षित

**प्रकाशक**

समन्वय प्रकाशन

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

मोबा. नं.: ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**

सौ. वृषालीराज बडकस

**मुखपृष्ठ**

चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**

ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**

सप्टेंबर, २०१३

**किंमत**

रुपये १९०/-

# प्रस्तावना

गरिबांना कस्पटाप्रमाणे लेखणारा अविचारी श्रीमंतांचा दुरभिमान व अपमान झाल्यामुळे चिडलेल्या गुणी गरिबांचा क्रोध, या मानापमानाच्या कात्रींत सापडल्यामुळे दोन वेळा मोडलेले धैर्यधर व भामिनी यांचे लग्न, खऱ्या प्रेमाचा पगडा मनावर बसून निरभिमानी बनलेल्या भामिनीच्या चतुर लीनतेने अखेरीस कसे घडून आले, याचे वर्णन या नाटकात केले असून, अंगावर दागिन्यांची ओझीच्या ओझी लादून घेणाऱ्या लक्ष्मीधराचा आचरटपणा, आणि गरिबांविषयीचा तिरस्कार अंगी भिनल्यामुळे गुणी गरिबांचा द्वेष करणाऱ्या विलासधराचा अभिमान या दोन तटांमधून, सदर प्रेमाचे प्रवाहास–तो स्पष्ट, जोराचा व मर्यादित दिसावा म्हणून–वाहावयास लाविले आहे.

संगीत नाटकांतील पदांकडे गायकी दृष्टीने पाहण्याची सवय वाचकांना लागावी म्हणून पदांच्या स्वरमालेचे (नोटेशन) पुस्तक स्वतंत्र न काढता किंवा तसल्या स्वतंत्र पुस्तकांकरिता पदांचा उपयोग इतर कोणासही करू न देता, नाटकांतच प्रत्येक पदाचे खाली 'स्वरमाला' देण्यांत आली आहे.

बाजाची पेटी वाजविण्यांत अत्यंत कुशल म्हणून महाराष्ट्रात महशूर असलेले रा. रा. गोविंद सदाशिव टेंबे यांनी या नाटकातील पदांच्या चाली दिल्या असून पदांची स्वरमालाही त्यांनीच तयार केलेली आहे. या कामी किर्लोस्कर संगीत मंडळीतील गायनपटु रा. नारायण दत्तात्रय जोगळेकर व रा. नारायण श्रीपाद राजहंस ऊर्फ बालगंधर्व आणि माझे गवई मित्र रा. रा. विठ्ठल महादेव ऊर्फ बापूराव फडके यांनी आस्थेने व हौसेने मदत केली आहे; या उपकाराबद्दल रा. टेंबे, रा. जोगळेकर, रा. बालगंधर्व व रा. फडके यांचे मानावे तितके आभार कमीच होत.

गद्य नाटकांत गुरफटून राहिलेल्या मनोवृत्ति 'मंडळीच्या' मृदु, गोड व गुंगविणाऱ्या गायनाने 'संगीताकडे' खेचून नेल्याबद्दल, पुस्तकात चित्रे घालण्याकरिता नटाचे त्या

त्या प्रसंगाचे फोटो दिल्याबद्दल, आणि पुस्तकरूपाने नाटक प्रसिद्ध होण्यापूर्वी त्याचे परिश्रमाने व कळकळीने बसविलेले प्रयोग करून दाखवून उपयुक्त सूचना केल्याबद्दल 'किर्लोस्कर मंडळी' चा मी फार आभारी आहे.

**ग्रंथकर्ता**

पुणे, ता. २० माहे एप्रिल
**१९११ इसवी**

# संगीत मानापमान

## अंक पहिला

### प्रवेश पहिला

(सूत्रधार व पारिपार्श्वक पूजापात्रे घेऊन उभे आहेत.)

**नांदी**

**पद १ - राग हमीर, ताल त्रिवट.**

नमन नटवरा विस्मयकारा । आत्मविरोधी कुतूहलधरा ।।धृ.।।
विवाह करुनी मदन जाळिला । मग मदनमित्र इंदू सेविला ।।
धनवैरागी द्यूत खेळला । गौरीचा तो अंकित झाला ।।
परमेशाच्या ऐशा लीला । कविकृष्ण गात विस्मयकारा ।।१।।

**पद २ - राग केदार, ताल त्रिवट.**

('रामनामकी ओट' या चालीवर)
मोद हराचा प्रेम वाढवो । क्रोध तयाचा गर्व घालवो ।।धृ.।।
रोषभरें तो विपिनीं बसतां । शिके पार्वती ललित लीनता ।
नाचत गातां मुदित शंकरा । ने परतोनी प्रेममंदिरा ।।१।।

**सूत्र०** :- परमेश्वराचे ध्यान इतकेच पुरे. तुम्ही असें करा, हीं पूजापात्रें आत नेवून तिला जरा इकडे पाठवून द्या.

**पारि०** :- महाराज, नाटकांच्या प्रारंभी नेहमीच आपण मला अशी आज्ञा करीत असतां; सुज्ञ सेवकाने धन्याला वारंवार तोच तो हुकूम करण्याची तसदी

देतां कामा नये; म्हणून आज ईशपूजेला येण्यापूर्वीच बाईसाहेबांना विनंति केली कीं, ईशस्तवन संपतें न संपतें तोंच आपण येथपर्यंत येण्याची कृपा करावी.

**सूत्र०** :- बरें केलेंत. आज घाईच केली पाहिजे. कारण -

**पद ३ - राग काफी, ताल दादरा.**

पंचशरें गद्यवरें वश जी झाली । नाट्यकला कविकृष्णा माला घाली ।।धृ.।।
ऐशा या समयाला । प्रेमरसें कवि नटला ।
गात असे कवनाला । संगीतीं नवलीला ।
ऐकाया लोलुप अति सभा बैसली ।।१।।

तेव्हा तुम्ही आगाऊ घाई केलींत, हे ठीक झाले. पण काय हो, अजून कां ती येत नाही?

**पारि०** :- मला वाटतें, त्या येणारहि नाहींत. बाईसाहेब मघांपासूनच दागिन्यांकरितां रागावून बसल्या आहेत. मीं विनंति केली त्या वेळीं त्या म्हणाल्या- (पडद्यांत-''मी साफ येणार नाही, पुन्हा बजावून सांगते मी साफ येणार नाही.'')

**सूत्र०** :- खरेच ती फार रागावल्यासारखी दिसते! मीं स्वत: जाऊन तिचे आर्जव केल्याशिवाय तिचा राग शांत होणार नाहीं.

(पारि० व सूत्र० जातात.)

(महिषासुरमर्दिनीचें देवालय. भामिनी व कुसुम प्रवेश करितात.)

**भामि०** :- मी साफ येणार नाही; पुन्हा बजावून सांगतें मी साफ येणार नाहीं. हा कायगं कुसुम तुझा लोचटपणा! मी एकदां येत नाहीं म्हणून सांगितले, तरी पुन्हां चल चल म्हणून तुझा तगादा माझ्या मागें आहेच!

**कुसु०** :- हे असे काय करतेस भगिनी? उशीर नाहीं का होत? हा पहा सूर्य अस्तास चालला; बाबासाहेबांनी तर सांगितले, दिवे लागतात न लागतात तों सेनापति धैर्यधर यांची मिरवणूक येथे येऊन पोचेल, आणि त्याचे आंत भामिनीला नटवून सजवून तयार करून ठेव म्हणून. अगं, तुझे धैर्यधरजींशी लग्न व्हायचें, आणि आतां नवरदेव येण्याच्याच वेळी तू अशी रुसलेली! हे तुला शोभतें का?

**भामि०** :- न शोभायला काय झालें? धैर्यधरजी पराक्रमी झाले, सेनापति झाले, तरी बाबांच्यापेक्षा गरीबच ना? नुसत्या पराक्रमावर बायकांचे मनच बसत नाहीं. मनाची हौस भागेल इतके दागिने घालणारा नवरा बायकांना आवडतो. ती पहा ती रजनी पराक्रमी सूर्याला, तो आरक्त झाला असतांहि, याच कारणाकरितां दूर लोटून देत आहे!

### पद ४ – राग यमनकल्याण, ताल त्रिवट.

(''पिअरवा ते हारी'' या चालीवर)

हा टकमक पाही सूर्य रजनिमुख लाल लाल,
परि ती नच जाई जवळि, म्हणत हा काळ काळ ।।धृ.।।
तनुवरी तारालंकार, त्यांत भर फार इंदु होत, त्यासि घालित माळ ।।१।।

आतां धैर्यधरजी येऊ देत खरे; या सूर्याची जी गत तीच दशा त्यांची केल्यावांचून मी राहायची नाही.

**कुसु०** :- भामिनी, असें भलतें भलतें बडबडूं नको. माझी भामिनी फार आज्ञाधारक म्हणून बाबासाहेब नेहमी तुझी तारीफ करीत असतात. चल मुकाट्याने त्या पलीकडच्या मंदिरात, आणि अंगाखांद्यावर दागिने घाल. नवरदेव धैर्यधरजींची स्वारी येथे आल्यावर महिषासुरमर्दिनीचा प्रसाद त्यांच्या हातीं देतांना नवऱ्या मुलीने लक्ष्मीसारखे सजले पाहिजे; हा कुळाचार आहे हो. बाबासाहेब आले आणि त्यांनी तुला अशी पाहिली म्हणजे ते रागावणार नाहीत का?

**भामि०** :- काहीं नको बाबांच्या रागाचा एवढा मला धाक घालायला! बाबांना मीं आजच सकाळीं सांगितले की मी कांही धैर्यधराशी लग्न करावयाची नाही. अगं, असल्या दरिद्र्याशी कोण लग्न करणार?

### पद ५ – राग शंकरा, ताल झंपा.

निर्धना जी वरी, आत्मवध ती करी । द्रव्यमय, भूवरी प्राण झाला ।।१।।
ना वसे निर्धनी, ललितमननंदिनी । रुचिर जी राहणी सुदराला ।।२।।
चारु वसनें जनीं प्रसरणें मोहिनीं हीं सुखें कोठलीं निर्धनाला ।।३।।

हे बघ कुसुम, बाबा रागावोत किंवा काही म्हणो, मी काहीं त्या दरिद्री धैर्यधराशी लग्न करावयाची नाही.

**कुसु०** :– गडे भामिनी, जरा विचार कर. तूं लक्ष्मीपुत्राची मुलगी असलीस म्हणून तुला लक्ष्मीपुत्राच्याच घरी दिली पाहिजे असे काही नाही.

**भामि०** :– का नाहीं? बाबांनी मला श्रीमंतच नवरा पाहून दिला पाहिजे.

**कुसु०** :– अगं, उत्तराधिपतीशी लढण्याकरिता आमच्या पृथ्वीवर महाराजांनी काय थोडे सेनानायक पाठविले? पराजय पावून इतके दिवस सर्व परतून नाही का आले? धैर्यधरजींच्याच पराक्रमामुळे आज दोन महिने उत्तराधिपति मागे हटला आणि लग्नकार्याचे बेत करायला थोडीशी फुरसत तरी मिळाली. ज्या वीराला जयश्रीने रणभुमीवर माळ घातली, त्या वीराला तुजसारख्या उपवर कन्या लग्नमंडपात माळ घालीत असतात, अशी पूर्वींची किती तरी उदाहरणे आहेत.

**भामि०** :– असतील गं उदाहरणे; पण ही भामिनी दुसऱ्याचे उदाहरण पाहून वागणारी नाही. माझ्या वर्तनाचा कित्ता इतरांना घालून देण्याकरितां मी जन्मास आले आहे, समजलीस.

**कुसु०** :– स्वयंवरात पण लावून, शौर्याची पारख करून, नंतर सीता द्रौपदीसारख्या राजकन्या लग्न करीत असत, त्यांना काही कळतच नव्हते म्हणायचे!

**भामि०** :– हो हो, नव्हतेच कळत. स्वयंवराचे वेळी नुसत्या पराक्रमावर भिस्त ठेवण्यात सीतेने काय किंवा द्रौपदीने काय, शहाणपणा दाखवला असे मला मुळीच वाटत नाही.

**पद ६ – राग झिंजोटी, ताल केरवा.**

(''मेरे गलि आ जाव'' या चालीवर)

वरि गरिबा वीरा जी अबला, सुख संसारीं ते केविं तिला ।।धृ.।।
राघव तोडित धनु ऋषिवेषें, मग जाई वना सीता बाला ।।१।।
अधन धनंजय मीनवधा करी, वनीं वास मग पांचालीला ।।२।।

**कुसु०** :– मी किती सांगितलें तरी तुझी समजूत पटायची नाही. त्या पहा अक्कासाहेब आल्या; सोनाराने कान टोचले म्हणजे–

**भामि०** :- अक्का येऊं दे, नाहीं तर बाबा येऊ देत. कोणी सांगितलें तरी मी ऐकावयाची नाहीं; अक्काचे लग्न व्हायचे नाही, आणि बाबांचेहि नाही; लग्न व्हायचें आहे माझें हो. (अक्कासाहेब, चंपा, मालती व विनोद येतात)

**अक्का०** :- वा! भामिनी तर येथेच आहे! मला वाटलें होतें, अंगाखांद्यावर दागिने घालून पलीकडच्या सज्जावर ताई उभी असेल. धैर्यधरजींची स्वारी इतक्यांत येथें यायची आहे! आणि हेगं काय कुसुम, ताईच्या अंगाखांद्यावर कांहीच नाहीं, हें कसें?

**विनो०** :- गरिबाची बायको होण्याचा धडा ताईसाहेब एव्हांपासूनच गिरवीत आहेत, असें दिसतें! अक्कासाहेब, माहेरी कंजारणीसारखें मिरवण्याची सवय असली म्हणजे सासरची गरीबी बाधत नाहीं.

**चंपा०** :- गरिबाची बायको होण्याची सवय लागावी म्हणून जर दागिने घालायचे नाहींत, तर गडे भामिनी, हा एवढा उंची शालू तरी कशाला नेसलीस?

**माल०** :- धैर्यधरजींच्या घरी इतकी साधी लुगडी नेसावी लागतील की, माहेरी लकतरें नेसणें आंगवळणी पडलेलें असल्याशिवाय कोणत्याही नवरीला सुम्मुखाच्या तसल्या नव्या साडीबद्दल धन्यता वाटायची नाही.

**चंपा०** :- बरे केलेत ताईसाहेब, लकतरें नेसण्याचा धडा एव्हापासूनच गिरवला नाहीत, बरे केलेत!

**विनो०** :- नवऱ्याच्या गरिबीची पहिली छाया दागिन्यांवर पडली आहे. बाबासाहेबांच्या सावलीतून निघून जेव्हा धैर्यधरजींच्या झोपडीत ताईसाहेबांची रवानगी होईल, तेव्हा दारिद्र्याचे ग्रहण वस्त्रपात्रालाही लागल्यावाचून राहणार नाही. श्रीमंतीतून गरिबीत जेव्हा उत्क्रांती होते, तेव्हा प्रथम दागिने नाहीसे होतात, आणि नंतर ठेवणीतल्या शालूचे काठ विकण्याची पाळी येते! बाहेर जाणाऱ्या लक्ष्मीची पावलें या अशा क्रमाने असतात.

**अक्का०** :- खरेंच ताई, तुला मी विचारतें, हा दरिद्री धैर्यधर तुला कसा आवडला? आश्चर्य आहे बाई! माझ्या लग्नाचे वेळी दोघी बहिणींची लग्ने एकदम व्हावी म्हणून लक्ष्मीधर जहागीरदारांना तुला देण्याचें ठरविलें-

**चंपा०** :- त्या वेळी आक्कासाहेबांच्या विलासधरजींच्या इतके लक्ष्मीधर श्रीमंत नाहीत म्हणून ताईसाहेब रुसून बसल्या आणि ते लग्न मोडलें!

**विनो०** :- विलासधरजींचे उत्पन्न पंचवीस लाखांचे आणि लक्ष्मीधरजींचे उत्पन्न चोवीस लाखांचे; ताईसाहेब, त्या वेळी ही एक लाखाची तफावत आपणास सोसवली नाही, आणि आता ज्याला रानांत शेत नाही आणि गावात घर नाही, अशा धैर्यधरजींच्या गळयांत माळ घालून दरसालची सबंध पंचवीस लाखांची तूट आपण कशी सोसणार? मी साफ सांगतो, वडील बहिणीमध्ये आणि धाकट्या बहिणीमध्ये इतके पंचवीस लाखांचे अंतर मजसारख्या तिऱ्हाइताला देखील पाहवणार नाही!

**माल०** :- कां ताईसाहेब, असें तोंडसें फिरविलें? सांगा, आपल्या पतिराजांचे उत्पन्न किती लाखांचे आहे ते सांगा, आणि करा या विनोदाचें तोंड बंद.

**भामि०** :- कोणाचा गं पतिराज म्हणतेस? त्या धैर्यधरांशी मी थोडीच लग्न करणार आहे? मी मघाशी तुम्हाला सांगितलें ना एकदा, त्या दरिद्र्याशी मी लग्न करणार नाही म्हणून; तरी आपलें धैर्यधरजी तुझा पतिराज हे तुमचे तुणतुणें कायम आहेच! आज सकाळी बाबांना जे मी सांगितलें तेंच मी अक्का, पुन्हा तुला सांगतें -

**पद ७ - राग भूप, ताल त्रिवट.**

(प्रभू उगङ्गुण गिनत या चालीवर.)

धनी मी, पति वरिल कशी अधना ।
पति जरि अधन, निधनसम; मानी भामा विफल इतर सुगुणा ।।धृ.।।
प्रखर पराक्रम वीर भानु भुलवित उषा रक्तवदना ।
तोचि निकट मग जातां जाळो तिजला; ऐशी भीति मना ।।१।। (जाते.)

**कुसु०** :- हे काय, ही तर रागावून निघून गेली! बाबासाहेबांनी मला सांगितले होते, धैर्यधरजी ज्या वेळी देवीच्या दर्शनाला येतील त्या वेळी भामिनीने देवीला प्रसाद म्हणून देवीच्या अंगावरील फुलांची माळ धैर्यधरजींच्या हातांत टाकावी.

**अक्का०** :- हो, हा तर आमचा कुळाचार आहे. माझ्या लग्नाचे वेळी याच महिषासुरमर्दिनीच्या मंदिरांत सीमंतपूजनाचा समारंभ झाला, त्या प्रसंगी देवीच्या दर्शनाला जेव्हा तिकडून यायचे झालें, तेव्हा प्रसाद म्हणून मीही